RNI No. MAHBIL/2009/31748
Reg. No. MH/MR/South-324/2010-12

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग एक-अ—मध्य उप-विभाग

वर्ष ३; अंक ६] शुक्रवार, एप्रिल ८, २०११/चैत्र १८, शके १९३३ [पृष्ठे २, किंमत : रुपये २०.००

असाधारण क्रमांक १८

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

## नगरविकास विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ५ एप्रिल २०११

**अधिसूचना**

**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९.**

क्रमांक स्थासंक २०११/प्र.क्र. ३३/११/नवि-३४.—मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई ५९) च्या कलम १२७ पोट-कलम (२) खंड (ककक) व १९ ग अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा आणि या संबंधात त्यास समर्थ करणाऱ्या अन्य सर्व शक्तींचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात उपभोग, उपयोग किंवा विक्री यासाठी शहराच्या हद्दीमध्ये होणाऱ्या मालाच्या प्रवेशावर जकात किंवा उपकर यांचे ऐवजी स्थानिक संस्था कर दिनांक १ जुलै २०११ पासून बसविण्याचे निर्देश देत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**विपक म्हैसेकर,**
शासनाचे उप सचिव.